"निर्गमित"
माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग,अमरावती खंडपीठ, अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम१९(३)अन्वये**
**दाखलझालेला द्वितीय अपील अर्ज**

**रामाआ- अपील क्र.अम- २४९/२०२०**

अपिलार्थी :- श्री.शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा.
रा. अंबर कॉलनी प्रभात नगर, भोसा रोड, राजु किराणा जवळ, यवतमाळ,ता. जि. यवतमाळ
विरुध्द
प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यवतमाळ.
जन माहिती अधिकारी तथा राज्य मार्ग परिवहन महामंडळ यवतमाळ.

**तक्रार सुनावणी दिनांक– २१/०१/२०२१**

तक्रारकर्ता यांनी दि.०३/११/२०२० रोजी आयोगाचे स्तरावर कलम १८ (१) (ग) अन्वये तक्रार दाखल करुन, दि.२२/०६/२०२० रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी सदर रक्कम बँकेत भरणा केल्या जात नाही असे बेकायदेशीर कळवुन अपिल निकाली काढले होते, असे नमुद केले आहे.त्यामुळे सबंधित दोषी अधिका-याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करावी असे निवेदन केले आहे.

प्रस्तुत तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारीमध्ये उपस्थित मुद्दे व कलम ७(१) च्या भंगाबाबत सर्व संबंधितांना सुनावनीसबंधी ई-मेलद्वारे सुचनापत्र पाठवुन त्यांचा लेखी व सविस्तर खुलासा करण्याबाबत तसेच बचावाची संधी देण्याच्या दृष्टीकोणातुन दि. २१/०१/२०२१ रोजी ऑनलाईन सुनावणीस बोलवले होते. त्यानुसार सुनावणीस तक्रारकर्ता हजर आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री. अविनाश राजगुरे विभाग नियंत्रक महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, यवतमाळ हे हजर आहेत. विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. द. र. मरसकोल्हे, विभागीय लेखा अधिकारी हे हजर आहेत.

अपिलार्थीने केंद्रित माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(१) नुसार केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार २००५ अंतर्गत अर्जदाराकडुन प्राप्त अर्जानुसार शुल्काचा भरणा रोखीने, चालान, C.D. धनादेशद्वारे घेवुन रक्कम माहितीचा अधिकार लेखाशिर्षाखाली चलनाद्वारे बँकेत भरणा केला त्याबाबत वर्षे निहाय्य चलनाच्या सत्यप्रतीची माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांचे कडुन सदर रक्कम बँकेत भरणा केल्या जात नाही असे बेकायदेशीर कळवुन अर्ज निकाली काढल्याचे दिसून येते.

उत्तरवादी यांचा तोंडी लेखी खुलासा व आजच्या गुगल मीट ॲपवरील ऑनलाईन सुनावणी लक्षात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जामधुन, शुल्काचा भरणा रोखीने, चालान, C.D.

धनादेशद्वारे घेवुन रक्कम माहितीचा अधिकार लेखाशिर्षाखाली चलनाद्वारे बँकेत भरणा केला त्याबाबत वर्षे निहाय्य चलनाच्या सत्यप्रतीची माहिती मागितली होती. तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ स्तरावरील होती. आयोगाच्या असे निदर्शनास आले की,तक्रारकर्ता यांना अद्याप पर्यंत माहितीचे प्रदान झालेले नाही. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी श्री. मरसकोल्हे हजर आहेत. त्यानुसार त्यांनी अपिलार्थी यांचा दि.२२/०६/२०२० रोजीचा अर्जाबाबत विचारणा केली असता, माहिती अधिकाराअंतर्गत अर्जदारकडुन शुल्क म्हणुन जी रक्कम भरल्या जाते ती रक्कम अर्जदाराला द्यावयाच्या सत्यप्रती/झेरॉक्स साठी खर्च केल्या जाते, ती रक्कम स्वतंत्रपणे बँकेत भरणा केल्या जात नाही असे सांगितले. परंतु माहिती ही नेहमी शुल्क आकारुन दिली जाते, २५ रु. पर्यत माहिती ही निशुल्क दिली जाते व त्याच्या किंमतीची माहिती असल्यास ते शुल्क आकारुन द्यावी लागते म्हणजे ते शासनाच्या महसुलाचा भाग असतो, म्हणुन त्यासाठी शासनाने एक लेखाशिर्षक तयार केले आहे आणि जे काही माहिती शुल्काची रक्कम वसूल करतो ते लेखाशिर्षकाने क्रेडीट करावी आणि तसे असुन देखील त्याच्या विसंगत स्वतःच्य अकाऊंट ला पैसे जमा केले ऐवढेच नाही तर ते कार्यालयीन बाबीवरती खर्च केले हे मोठे आक्षेपार्ह आहे. ही खर्चाची योजना माहिती शुल्क वसुली मधुन नाही आहे. यामध्ये वित्तीय अनिमित्ता दिसुन येते याबाबत खालीलप्रमाणे आदेश करण्यात येते.

**आदेश**

**उपाध्यक्ष MSRTC महाराष्ट्र मुंबई यांनी याबाबत नेमकी केव्हापासुन नेमकी किती शुल्काची वसुली केली आणि त्यापैकी कशावर खर्च केला, शासनाचा महसुल बुडविला हे जबाबदारी निश्चित करावी, कार्यवाही करावी व अनुपालन अहवाल सादर करावा.**

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

सत्यमेव जयते

**(संभाजी सरकुंडे**
**राज्य माहिती आयुक्त, अमरावती.**

जा.क्र.अ. /२०१७-१८/२९०४ /२०२० दि. 2/8/2021 २१/०६/२०२१

श्री. लटके